# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. क्रमांक | पुस्तकाचे नाव | भाषा | किंमत | पॅकिंग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्चरित | मराठी | ४८.०० | १२.०० |
| २. | श्री साई सत्चरित | इंग्रजी | १८.५० | १०.०० |
| ३. | श्री साई सत्चरित | हिंदी | २४.०० | १०.०० |
| ४. | श्री साई सत्चरित | गुजराथी | २३.०० | १०.०० |
| ५. | श्री साई सत्चरित | कन्नड | २२.०० | १०.०० |
| ६. | श्री साई सत्चरित | तेलुगु | २७.०० | १०.०० |
| ७. | श्री साई सत्चरित | तामीळ | २७.०० | १०.०० |
| ८. | श्री साई सत्चरित | सिंधी | २२.०० | १०.०० |
| ९. | श्री साई सत्चरित पोथी | गुजराथी | ३१.०० | १२.०० |
| १०. | श्री साईलीलामृत | मराठी | ९.५० | १०.०० |
| ११. | श्री साईलीलामृत | हिंदी | १२.५० | १०.०० |
| १२. | श्री साईलीलामृत | गुजराथी | ६.६५ | ८.०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | ६.८० | ८.०० |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | १.०० | ८.०० |
| १५. | स्तवन मंजिरी | हिंदी | १.१५ | ८.०० |
| १६. | स्तवन मंजिरी | गुजराथी | १.३० | ८.०० |
| १७. | स्तवन मंजिरी | इंग्रजी | २.०० | ८.०० |
| १८. | सगुणोपासना (आरती) | मराठी | १.२५ | ८.०० |
| १९. | सगुणोपासना (आरती) | हिंदी | १.५० | ८.०० |
| २०. | सगुणोपासना (आरती) | गुजराथी | १.१० | ८.०० |
| २१. | सगुणोपासना (आरती) | तेलुगु | ४.६० | ८.०० |
| २२. | सगुणोपासना (आरती) | सिंधी | - | ८.०० |
| २३. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | ३.०० | ८.०० |
| २४. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | - | ८.०० |
| २५. | मुलांचे साईबाबा | मराठी | २.०० | ८.०० |
| २६. | मुलांचे साईबाबा | इंग्रजी | २.६० | ८.०० |
| २७. | मुलांचे साईबाबा | हिंदी | २.०० | ८.०० |
| २८. | मुलांचे साईबाबा | गुजराथी | १.७५ | ८.०० |
| २९. | मुलांचे साईबाबा | तेलुगु | - | ८.०० |
| ३०. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | १.१५ | ८.०० |
| ३१. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ६.७० | ८.०० |
| ३२. | साईबाबा ऑफ शिरडी (भरुचा) | इंग्रजी | - | ८.०० |
| ३३. | साईबाबा ऑफ शिरडी (प्रधान) | इंग्रजी | ३.५० | ८.०० |
| ३४. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | - | १०.०० |
| ३५. | खापर्डे डायरी | इंग्रजी | ११.०० | १०.०० |

# साईभक्तांना आवाहन

प्रिय साईभक्तांनो !
सप्रेम नमस्कार,

आपण 'श्री साईलीला'चे वाचक आणि वर्गणीदार आहात. 'श्री साईलीला'चे नवे स्वरूप आपण सर्वांनाच आवडले आहे. आपणापैकी तशी पत्रे आम्हाला पाठविली आहेत. त्याबद्दल धन्यवाद !

श्री साईबाबांचे कार्य, त्यांची शिकवण, भक्तांना आलेले त्यांचे अनुभव आणि अध्यात्माचा प्रसार अधिकाधिक लोकांत करणे म्हणजेच साईसेवा आहे. त्यासाठी 'श्री साईलीला' सर्वाधिक लोकांपर्यंत पोहोचावयास हवा. या साईसेवेत आपण वाढ करू शकता !

आपण फक्त पाच वर्गणीदार 'श्री साईलीला'स मिळवून द्यायचे, यामुळे आपल्या हातूनही साईसेवा घडेल आणि श्री साईबाबा आपल्यावर कृपा करतील याची आपणासही कल्पना आहेच.

तरी खालील फॉर्मवर पाच वर्गणीदारांचे पत्ते व प्रत्येकी ५० रु. प्रमाणे एकूण २५० रु. पाठवावे.

कळावे. श्री साईबाबांच्या आशीर्वादासह !

आपला स्नेहांकीत,
**विद्याधर ताठे**
कार्यकारी संपादक
'श्री साईलीला'

इथे कापा

कार्यकारी संपादक
'श्री साईलीला',
८०४-बी, साईनिकेतन,
डॉ. आंबेडकर रोड, दादर (पू.),
मुंबई - ४०० ०१४.

यांस,

आपण साईभक्तांना आवाहन केल्याप्रमाणे सोबतच्या जोडलेल्या कागदावर पाच वर्गणीदारांचे पत्ते पाठवीत असून त्यांची प्रत्येक ५० रु. प्रमाणे रु. २५० (एकूण दोनशेपन्नास मात्र) सोबत मनीऑर्डरने/चेकद्वारा/रोख पाठवीत आहे. त्याचा स्वीकार व्हावा.

श्री साईबाबांच्या शिकवणुकीचा प्रसार करण्याची संधी आपण यानिमित्ते मला देऊन साईसेवा करण्यास उद्युक्त केलेत याबद्दल आभारी आहे. कळावे.


आपला,

नाव : ______________________

पत्ता : ______________________

______________________

(ता.क.: सोबतच्या कागदावर पाच नव्या वर्गणीदारांचे पत्ते जोडले आहेत.)




श्री साई नामजप यंत्र

यंत्रसंकल्पना, निर्मिती व हस्ताक्षरांकन
वसंत गोडबोले
१२५, शनिवार पेठ (नेनेघाट), पुणे ३०

# गुरुपौर्णिमा उत्सव शिर्डी



उत्सवानिमित्त श्रीसाईपादुकांची पूजा करताना संस्थानचे अध्यक्ष श्री. द. म. सुकथनकर व विश्वस्त श्री. रमेश सोनी



उत्सवामध्ये ३ दिवस, इंदोर (म. प्र.) येथील ह. भ. प. श्री. रा. आळेकर यांची सुश्राव्य कीर्तने झाली




प्रसिद्ध पार्श्वगायक श्री. जयवंत कुलकर्णी यांनीही उत्सवात बाबांपुढे आपली सेवा रुजू केली.



उत्सवासाठी लोटलेला साईभक्तांचा सागर



भक्तिसंगीत सादर केलेल्या सौ. रजनी जोशी यांचा विश्वस्त श्रीमती रेखाताई दिघे यांनी संस्थानतर्फे सत्कार केला.

सर्व छायाचित्रे : नितीन मिराणे

...ed with the Registrar for News-papers of India No. MH/527





श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत नियतकालिक


नोव्हेंबर-डिसेंबर १९९८

# श्री साईलीला

संपादक : द. म. सुकथनकर

कार्यकारी संपादक : विद्याधर ताठे

रुपये ८



# दसरा उत्सव, शिरडी



दसरा उत्सवात श्री साईबाबांची तसबीर, श्री साईसचरित पोथी व वीणा यांच्या मिरवणुकीत सहभागी झालेले संस्थानचे अध्यक्ष आणि अन्य सदस्य.



श्री साईसचरित पोथीच्या अखंड पारायणाचा प्रारंभ करताना संस्थानचे अध्यक्ष श्री. द. म. सुकथनकर आणि अन्य सदस्य.



दसऱ्याच्या शुभमुहूर्ती श्री साईबाबांचा पुण्यतिथी उत्सव साजरा केला जातो. उत्सवात सहभागी झालेल्या साईभक्तांचे एक दृश्य.



उत्सवात दरदिवशी कीर्तनाचा कार्यक्रम संपन्न होतो. महिला कीर्तनकार सौ. आजेगांवकर यांनी या उत्सवात एक दिवस आपली सेवा श्रीसाईचरणी रुजू केली.



उत्सवात एक दिवस श्री साईबाबांची पाद्यपूजा करताना संस्थानचे सदस्य श्री. रामचंद्र गोसावी व ॲडव्होकेट श्री. एस्. एम्. घोरडे.



दसरा उत्सवात 'भिक्षा झोळी' हा एक विशेष लक्षवेधी कार्यक्रम असतो. यंदाच्या उत्सवात या कार्यक्रमात सहभागी झालेले संस्थानचे विश्वस्त श्री. मोहन जयकर व श्री. राजीव रोहोम.

श्री साईबाबा संस्थान शिरडीचे
अधिकृत नियतकालिक

# श्री साईलीला

वर्ष ७६

नोव्हेंबर-डिसेंबर १९९८

: संपादक :
**द. म. सुकथनकर**

: कार्यकारी संपादक :
**विद्याधर ताठे**

: कार्यालय :
'साईनिकेतन',
८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई - ४०० ०१४.
दूरध्वनी. : ४१६ ६५ ५६
फॅक्स : (०२२) ४१५ ०७९८


: मुद्रक :
**गीता ऑफसेट, मुंबई.**

: टाईपसेटींग :
**देवयानी एन्टरप्रायझेस, मुंबई.**

वार्षिक वर्गणी : रु. ५०/-
आजीव सभासद वर्गणी : रु. १०००/-
परदेशाकरिता वार्षिक वर्गणी :
रु. १०००/-
(टपाल खर्चासहित)
अंकाची किंमत : रु. ८/-

मुद्रक, प्रकाशक द. म. सुकथनकर, अध्यक्ष श्री साईबाबा संस्थान, शिरडी यांनी हे नियतकालिक, 'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - १४ येथे छापून प्रसिद्ध केले.

या नियतकालिकातील लेखांत प्रसिद्ध झालेली मते ही त्या लेखांतील लेखकांची स्वतंत्र मते असून त्या मतांशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.



## अंतरंग

| | |
|---|---|
| ❑ संपादकीय : विद्याधर ताठे | ३ |
| ❑ दत्तावधान | ५ |
| ❑ श्रद्धा व सबुरी : प्रा. अजित कुळकर्णी | ६ |
| ❑ अग्निहोत्र : सुधीर हुकेरीकर | ८ |
| ❑ अमृतकलशे | ११ |
| ❑ आत्मदर्शन : राधाकृष्ण गुप्ता 'चेतन' | १४ |
| ❑ साईउवाच : संग्राहक - प्र. का. सोमण (निवृत्त ले. कर्नल) | १८ |
| ❑ श्री दत्तजन्म | २१ |
| ❑ उत्तम पुरुष | २९ |
| ❑ नाम आणि प्रारब्ध : सौ. गीता गोविंद कुंटे | ३० |
| ❑ माणूस बदलला ! : ह. ल. रानडे | ३१ |
| ❑ साईवंदना | ३४ |
| ❑ साई अनुभव : | ३८ |
| ❑ संस्थान प्रकाशित छायाचित्रांची सूची | ४६ |
| ❑ संस्थान प्रकाशित ग्रंथांची सूची | ४७ |
| ❑ साईभक्तांना आवाहन | ४८ |



# श्री साईबाबा संस्थान शिरडी

## विश्वस्त मंडळ

**श्री. द. म. सुकथनकर**
(अध्यक्ष)

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. मोहन मो. जयकर | (सदस्य) | श्री. रायभान ग. चिने | (सदस्य) |
| श्री. रमेश दा. सोनी | " | श्री. भास्कर शं. बोरावके | " |
| श्रीमती रेखा ग. दिघे | " | श्री. अण्णासाहेब सा. म्हस्के पाटील | " |
| श्री. प्रकाश व. कारखानीस | " | श्री. राजीव पुं. रोहोम | " |
| श्री. मुकेश र. पटेल | " | श्री. संभाजी कि. काळे | " |
| श्री. मधुकर द. जोशी | " | श्री. अशोक भि. खांबेकर | " |
| श्री. प्रकाश प्र. वैशंपायन | " | श्रीमती प्रेमाबाई सो. बज | " |
| श्री. मधुकर ज. गर्दे पाटील | " | श्री. रामचंद्र नि. गोसावी | " |
| श्री. देवकीनंदन शं. सारस्वत | " | श्री. प्रभाकर तु. बोरावके | " |
| श्री. आप्पासाहेब खं. कोते | " | श्री. सोपान मा. धोर्डे | " |

कार्यकारी अधिकारी : श्री. अजित पवार

# संपादकीय



**लहानथोर तुम्ही सगळे ।**
**हे साईंचे चरित्र आगळे ।**
**होऊनि क्षणैक संसार वेगळे ।**
**परिसा भोळे भाविक हो ।**

**'श्री** साईलीला' या १९९८ वर्षातील हा शेवटचा अंक आहे. आता यानंतर आपली भेट १९९९ मध्ये नव्या वर्षाच्या पहिल्या अंकाद्वारे होईल. अनेक भक्त आपल्या वर्षाची अखेर व नववर्षाचा 'श्रीगणेशा' शिरडीला जाऊन श्री साईनाथांचे दर्शन घेऊन करतात. यामुळे २५ डिसेंबरपासून ३-४ जानेवारीपर्यंत शिरडीला अफाट गर्दी होत असते. थंडीचे दिवस असतात, नाताळची सुट्टी असते आणि शिरडी साईभक्तांनी बहरून गेलेली असते.

शिरडी संस्थानमध्ये जे उत्सव साजरे केले जातात, त्यामध्ये वर्षाअखेरीस डिसेंबरमध्ये येणारा श्री दत्तजयंती उत्सव हा एक महत्त्वाचा उत्सव आहे.

**जया मनी जैसा भाव ।**
**तया तैसा अनुभव ।**

या उक्तिप्रमाणे श्री साईंनी भक्तांना त्यांना आवडणाऱ्या इष्ट देवतेच्या रूपात दर्शन दिलेले आहे. कोणाला पंढरीनाथ श्री विठ्ठलाच्या, कोणाला श्रीरामाच्या, कोणाला श्रीकृष्णाच्या, तर कोणाला श्री गुरुदेवदत्ताच्या रूपात दर्शन देऊन श्री साईनाथांनी ईश्वर एक आहे, या महातत्त्वाचेच दर्शन घडविलेले आहे. या भूतलावर जमीनजुमला-इस्टेट-संपत्ती यापेक्षा अधिक संघर्ष पंथ-संप्रदायाच्या आपसी अहंकारातून झालेले आहेत, हे सत्य लक्षात घेतल्यावर 'ईश्वर एक आहे' या श्री साईबाबांच्या संदेशाचे कालसापेक्ष माहात्म्य पटू लागते. ईश्वराने जर माणसात फरक केलेला नाही तर माणसानेच पंथ-उपपंथांचे नसते भेद निर्माण करून माणसाला माणसापासून दूर करण्याचे पाप का करावे ?

श्री गुरुदेव दत्त अवतार हा ब्रह्मा-विष्णू-महेश या तीन देवांचा महासमन्वय आहे. श्री साईबाबांना असंख्य साईभक्त श्री दत्तगुरुंचा अवतार मानतात. यादृष्टीने शिरडीच्या मंदिरात धूप आरतीच्या वेळी जी आरती होते तीमधील पुढील ओळी लक्षणीय आहेत, चिंतनीय आहेत.

**कलियुगी अवतार ।**
**सगुणब्रह्म साचार ।**
**अवतीर्ण झालासे ।**
**स्वामी दत्त दिगंबर ।**

**ऐसा येई बा ।**
**साई दिगंबरा ।**
**अक्षयरूप अवतारा ।**
**सर्वहि व्यापक तू ।**
**श्रुतिसारा । अनुसयाऽत्रिकुमारा ॥**



सती अनुसया त्रिकुमारा म्हणून साईंचा या आरतीत होणारा गौरव आपल्यापुढे दत्तावताराची कथा उभी करतो. दत्तावताराची कथा आबालवृद्धांना सुपरिचित आहे. महाराष्ट्राला दत्तोपासनेची फार मोठी परंपरा आहे. दत्त पंथात अनेक साक्षात्कारी संत झालेले आहेत. अक्कलकोटचे स्वामी समर्थ आणि शिरडीचे साईबाबा यांना दत्तभक्तांनी-दत्त पंथियांनी दत्त अवतारी संत मानलेले आहे. यातून आपणास श्री साईंचे सर्वव्यापकत्व दिसून येते.

दत्तजयंतीकाळात प्रकाशित होणाऱ्या प्रस्तुत द्वैमासिकात प्रा. अजित कुळकर्णी यांचा 'श्रद्धा सबुरी' हा लेख, लेखक-कवी चेतन यांची रमण महर्षींचे आत्मदर्शन घडविणारी साहित्यकृती, श्री. रानडे यांची बोधकथा आदी वाचनीय मजकूर दिलेला आहे. त्याशिवाय श्री साईबाबा संस्थान शिरडीतर्फे लेखक-पटकथा लेखक यांना करण्यात आलेले एक आवाहनही या अंकात आहे. तरी, संबंधितांनी या आवाहनाची दखल घेऊन स्वत: लेखन करावे वा परिचित लेखक-पटकथा लेखकांना लेखन (स्क्रिप्ट) पाठविण्यास कळवावे. श्री साईबाबा संस्थानला बाबांच्या जीवनावर एक चित्रफित तयार करावयाची आहे. यासाठी भक्तांनी सर्व प्रकारचे सहकार्य द्यावे, ही विनंती.

**गुरूपायामाजी आहे सर्व कांही ।**
**गुरूवीण नाही सार्थकता ।**
**गुरू कामधेनू गुरू कल्पलता ॥**

**विद्याधर ताठे**
कार्यकारी संपादक, श्री साईलीला

दत्तजयंतीच्या
निमित्ताने....

# दत्तावधान





तरी होऊनियां दत्तावधान।
श्रोतां भावार्थे परिसिजे निरूपण।

जीवाचं पृथ्वीतलावर आगमन, अस्तित्व व अस्त या त्रयींवर दृष्टी ठेवून असणारं अनादि, अनंत, अथांग, अगाध, अपार, अपरिमित, अगणित, अगम्य असं अदृश्य अस्तित्व अथक, अविरत कार्यरत असतं....

'अवधान' ठेवून प्रसंगाला सामोरं जाणं व अन्यजणांच्या सहाय्यार्थ तत्परतेने 'दत्त' म्हणून उभं राहणं, म्हणजेच 'दत्तावधान' होय! श्री साईबाबांच्या देहावतारातील, त्यांचे ठायीठायीचे अनुभव हे 'दत्तावधान' दाखवून देतात. सन १९१०.... धनत्रयोदशीचा तो दिवस.... कुण्या एका गावी लोहारणीच्या कडेवरून निसटत असलेली कोवळी पोर बाबांच्या दिव्य दृष्टीत आली.... आणि इकडे शिरडीत पेटत्या ज्वाळांत, धगधगत्या धुनीत बाबांनी हात घातला.... आणि तिकडे त्या कोवळ्या पोरीचा जीव वाचला. बाबांचे हात पार पोळले. हे पाहून जीव कासावीस झालेल्या त्यांच्या निस्सीम भक्ताने - माधवराव देशपांडे - शाम्याने विचारले, बाबा, हे तुम्ही काय केलेत ? का उगाचि हात भाजूनि घेतलात ? त्यावर दयार्द्र, कनवाळू, परम कृपाळू साईबाबा काय बोलले ते पहा.... **भाजूं दे रे हात मेला। प्राण रे वांचला पोरीचा ॥....**

....असाच एक अद्‌भुत प्रसंग दादासाहेब खापर्डे यांच्या पत्नीने शिरडीत अनुभवलेला. गावात ग्रंथीज्वराची साथ आली. दादासाहेब खापर्डे यांच्या मुलाला त्या ग्रंथीज्वराने गाठले. दादासाहेबांची कारभारीण कोण घाबरली ! एवढ्या दूरच्या खेडेगावात कसं काय करावं याचं काहूर तिच्या डोक्यात माजलं, जीव तिचा अगदी घाबराघुबरा झाला. मनात आलं; आता अमरावतीस परतावं. मुलगा तापाने फणफणत होता, तरी मनी निश्चय केला आणि बाबांची आज्ञा घेण्यास ती निघाली. सायंकाळची वेळ होती. बाबा अस्तमानच्या फेरीत होते. खापर्डे बाई जाऊन बाबांच्या पायावर कोसळल्या. कसंबसं तोंडातून जे काही निघालं ते बाबांना सांगितलं.... मेणाहूनि मऊ मन जयाचे त्या साईमाऊलीचं, मायमाऊलीचं हृदय द्रवलं.... कफनी कंबरेपर्यंत उचलून दाखवितात, तो काय, कुक्कुटीच्या अंड्यांएवढ्या चार ग्रंथी टवटवून बाबांच्या अंगावर उठलेल्या ! बाबांनी खापर्डे बाईंना धीर देत म्हटलं.... **आभाळ आलें आहे जाण। पडेल माऊस पीक पिकोन। आभाळ वितळून जाईल ॥ भितां किमर्थ....** इतरांच्या कल्याणाकरिता 'अवधान' ठेवून प्रसंगी स्वतःच्या जीवावर बेतवून सहाय्यार्थ 'दत्त' म्हणून उभी राहणारी साईमाऊली, केवळ सकलांच्या कल्याणाकरिता अवतरित झालेली करुणामूर्ति, कैवल्यमूर्ति, ज्ञानमूर्ति होय !

घार हिंडे आकाशी, चित्त तिचे पिलापाशी.... साईभक्त ही साईंची लेकरं आहेत.... तुम्ही कुठेही असा, काहीही करा, लेकुरवाळ्या साईमाऊलीचं चित्त तुमच्यापाशी अखंड आहे, याचं स्मरण निरंतर ठेवा, त्यांची शिकवण प्रत्यक्ष आचरणात आणा, साईअवधुताचं दत्तावधान अंगिकारा, अदृश्य अस्तित्व अनुभवा ! साईअवधुताचं ध्यान केल्यानं कोणत्याही प्रसंगाला सामोरं जाण्याचं धैर्य, धाडस अंगी निर्माण होतं, हे पक्कं ध्यानात ठेवा !

**- साईचरणकण**

# श्रद्धा व सबुरी

– प्रा. अजित कुळकर्णी



श्री साईबाबा यांच्या जीवनचरित्रात दोन शब्दांना फार मोठे महत्त्व आहे, ते शब्द म्हणजे 'श्रद्धा व सबुरी' ! हे दोन शब्द खऱ्या अर्थाने आचार्यांच्या ब्रह्मसूत्रांसारखे आहेत.

मानवतेचा धर्म सांगणारे साईबाबा असले तरी आचार-विचार जे म्हणून प्रकट होत होते, ते म्हणजे निर्गुण निराकार परब्रह्मतत्त्वाचा आविष्कार होता. परंतु हे परब्रह्मतत्त्व साईबाबांनी दोन शब्दांत अखिल मानवाला प्रदान केले होते, ते म्हणजे 'श्रद्धा व सबुरी' !

सबंध विश्वात सर्व जाति, सर्व पंथांत, सर्व धर्मांत, ईश्वर संकल्पना स्वीकारली आहे. त्याची स्वरूपे भिन्न-भिन्न असली तरी, यामागील अंतिम सत्य एकच एक आहे, असे म्हणावे लागेल.

श्रीमद् शंकराचार्य यांच्या 'विवेकचुडामणि' या ग्रंथात ज्या गोष्टींचा समावेश आलेला आहे त्यातील 'श्रद्धा व सबुरी' हे सूत्रात्मक रहस्य समजून घेणार आहोत.

## श्रद्धा :

शंकराचार्यांचा प्रतिपाद्य विषय हा अद्वैत सिद्धान्ताचा आहे. शंकराचार्य म्हणतात की, ब्रह्मविद्या जाणण्यासाठी चार साधनांची आवश्यकता आहे. ती अशी, आत्मानात्म विवेक, वैराग्यसंपन्नता शमादिषट्क संपत्ती, व मुमुक्षुत्व (जाणण्याची जिज्ञासा). या साधनांपैकी, शमादिषट्काची संपत्ती कोणती, तर शम, दम, उपरति, तितिक्षा, श्रद्धा व समाधान. यालाच सहा धर्म म्हणून आचार्य म्हणतात. हा धर्म कर्तव्याच्या अंगाने व गुणांच्या अंगाने आहे. या धर्म-कर्तव्य व गुण विचारात श्रद्धा व सबुरी (तितिक्षा) या शब्दांचा समावेश आहे. आचार्यांनी श्रद्धेचे लक्षण व्यक्त करताना सांगितले की,

**शास्त्रस्य गुरुवाक्यस्य सत्यबुध्दयवधारणम् ।**
**सा श्रद्धा कथिता सद्भिर्यया वस्तूपलभ्यते ॥**

भावार्थ : शास्त्रवचने व गुरूवाक्य ही दोन्ही सत्य असून, जो बुद्धीचा निश्चय करतो, त्याला आत्मवस्तु प्राप्त होते. त्याला सज्जन लोक 'श्रद्धा' असे म्हणतात.

आचार्यांनी हे श्रद्धेचे लक्षण सांगितले आहे.

मानवी जीवनात श्रद्धेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. 'श्रद्धा' ही एक अवस्था आहे. ज्ञानजिज्ञासेपोटी, विश्वासाने

मनुष्याने केलेल्या कृतीचे रूपांतर श्रद्धेमध्ये होते. म्हणून ही एक मानसिक अवस्था म्हणता येईल. यासाठी साईबाबांचे अखिल मानवाला सांगणे आहे की, डोळसपणे या परमेश्वरावर, अल्लावर, सबका मालिक एक है, याच्यावर श्रद्धा ठेवून जीवन जगावे. **"निश्चयाचे बळ तुका म्हणे हेचि फळ।"** याप्रमाणे बुद्धीने एकदा का एखाद्या गोष्टीचा निश्चय केला की, कार्याला सफलता येते. लौकिक व पारलौकिक दोन्हीही विचारांच्या अंगाने या 'बळ' सामर्थ्याची गरज आहे. असा 'श्रद्धा' या शब्दामागे अत्यंत गहन अर्थ भरला आहे. मनुष्याच्या कर्माला वा क्रियेला निश्चयात्मक शक्तीची प्रेरणा या श्रद्धेमधून प्राप्त होत असते.

एक गोष्ट लक्षात घ्यावी की, 'श्रद्धा' ही शास्त्रीय दृष्टीने कधीही अंध नसते. मनुष्याचा जो विश्वास असतो तो नेहमी 'होकारात्मक' (Positive) असतो. तेव्हा हा विश्वासच पुढे 'श्रद्धा' या शब्दाला पात्र झालेला असतो. ही एक अनुभूती असते. जेव्हा मनुष्याला त्याच्या विश्वासाची प्रचिती येत नाही, तेव्हा त्याला 'दिशाभूल' झाल्याचे समजते. परंतु सद्‌विश्वासाचे रूपान्तरच 'श्रद्धा' या संज्ञेत होत असते. त्यामुळे श्रद्धा कधीच 'अंध' होवू शकत नाही; कारण डोळस विश्वासच डोळस श्रद्धा बनत असते. शब्द, त्याचा अर्थ व त्याची प्रचिती आपण घेवू, तेव्हा त्याचा उलगडा होवू शकतो.

उदाहरणाने हे पाहू या. मला शिरडीला जावयाचे आहे. तेव्हा मी जाणकारांना विचारेन. त्याप्रमाणे कृती करेन व शिरडीला पोहोचेन. कृती कार्य घडली तर, माझा निश्चय आहे व मी सांगणाऱ्यांवर विश्वास ठेवला होता व तशी प्रचिती आल्यावर काय म्हणतो की, ....याने सांगितल्याप्रमाणे केले व त्याची मला प्रचिती आली किंवा मला अनुभव आला, म्हणून तो विश्वास माझी 'श्रद्धा' बनली. समजा, तसा अनुभव आला नसता तर म्हटलं असतं का, "माझी अंधश्रद्धा होती". माझी श्रद्धा डोळस आहे. परंतु अनुभव हा दिशाभूल करणारा आला आहे.

यासाठी साईबाबांचे अखिल मानवाला एकच सांगणे आहे.... सर्वांनी निश्चयात्मक बुद्धीने कर्म करावे. श्रद्धेने वागावे. सद्धर्म, सद्‌विचाराने वागावे. मानवधर्म श्रेष्ठ आहे हा संदेश 'श्रद्धा' या एकाच गोष्टीतून व्यक्त होत आहे.

## सबुरी

सबुरी म्हणजे तितिक्षा असा अर्थ आहे. मनुष्याने सदैव धीराने, संयमाने रहावे, हा यामागे उद्देश आहे.

आचार्यांच्या शमादिषट्क संपत्तीत तितिक्षा हे साधन 'सबुरी' म्हणूनच आहे. याचे लक्षण आचार्य असे सांगतात कीं,

**सहनं सर्वदु:खानामप्रतीकार पूर्वकम् ।**
**चिन्ताविलापरहितं सा तितिक्षा निगद्यते ।।**

भावार्थ : आध्यात्मिक, आधिभौतिक व आधिदैविक अशा सर्व दु:खाची काळजी व शोक न करता त्यांच्या निवारणार्थ उपाय योजून सहन करणे यास 'तितिक्षा' (सबुरी) म्हणतात.

साईबाबा हे एक अवलिया होते. अखिल मानव समाजाचे केवळ दु:ख निवारण करून समाज सुखी व संपन्न कसा होईल इकडे लक्ष साईबाबांचे होते. त्यामुळे येणाऱ्या भक्ताजवळ दोन शक्तीची गरज आहे, हे ओळखून हे दोन महामूल मंत्र सांगितले आहेत, तेच 'श्रद्धा व सबुरी' होय. मनुष्याजवळ तितिक्षा व सबुरी असेल तरच ईश्वरशक्तीची अनुभूती येवू शकेल. म्हणून संत म्हणजे -

**ऐंसी कळवळ्याची जाति ।**
**करी लाभाविण प्रिती ।।**

या कोटीतील वात्सल्यभावाचे साईबाबा असल्यामुळे 'लेकुरांचे हित' कशात आहे, हेच केवळ बोलत असत. शब्दार्थापेक्षा बाबांच्या बोलण्यात व वागण्यात गहन अर्थ खूप असल्याचे दिसून येते. **"सहज बोलणे हाचि हित उपदेश !"** असे बाबांचे सांगणे आहे.

मनुष्याने केवळ कोणत्याही गोष्टीची काळजी करून चालणार नाही, तर त्याबरोबर प्रत्येक गोष्टीसाठी तितिक्षा (सबुरी) असली पाहिजे. सहनशक्ती असली पाहिजे. हे तुकारामाच्या अभंगातून समजेल ते असे -

**वाहिल्या उद्वेग दु:खची केवळ ।**
**भोगणे ते फळ संचिताचे ।।**

यासाठी मनुष्याने श्रद्धेने संतांकडे जावे, आणि तितिक्षेने (सबुरी) याची अनुभूती येईल, व जीवन आनंदमय होईल. म्हणून साईबाबांचा प्रतिज्ञारूप अभंग आहे -

**शिरडीस ज्याचे लागतील पाय ।**
**टळती अपाय सर्व त्याचे ।**

असे हे 'श्रद्धा व सबुरी' दोन शब्द म्हणजे मानवतेचे उदात्तीकरण आहे. अखिल मानव समाजासाठी विश्वशांतीसाठी प्रदान केलेली ही एक सूत्रात्मक संपदा आहे, असे म्हणावे लागेल. ❑❑❑

# घातक प्रदूषणावरील उपाय :
# अग्निहोत्र

– सुधीर हुकेरीकर, मुंबई.

एका दैनिकाच्या पुरवणीत 'जीवनरक्षक मास्क' हा वि. गो. भागवत यांचा लेख प्रसिद्ध झाला आहे. लेखकाने वाहनातून बाहेर टाकले जाणारे धूर व वायु, जसे सल्फर डायॉक्साइड, नायट्रोजन ऑक्साइड, कार्बन मोनॉक्साइड, तसेच हवेत तरंगणारे पदार्थ इत्यादी गोष्टींमुळे प्रदूषण झाले आहे असे नमूद केले आहे. या प्रदूषणामुळे नागरिकांमध्ये दमा, खोकला, श्वसनसंबंधीच्या व्याधी, तसेच बेंझेनमुळे कर्करोग होऊ शकतो, हेही लिहिले आहे. हे सर्व तंतोतंत खरे आहे म्हणूनच सबंध जगात सर्व स्तरांवर या प्रदूषणावर प्रभावी उपाय शोधण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. लेखात म्हटल्याप्रमाणे रस्त्यावरून चालतानाच या प्रदूषणाचा त्रास होतो, असे नव्हे, तर आपल्या घरचे वातावरणही, ज्यात आपण जास्तीत जास्त वेळ असतो, तितकेच प्रदूषित आहे. शिवाय, मास्क वापरण्याने फार फार तर तरंगणाऱ्या पदार्थांपासून (Suspended Particulate Matter) तात्पुरती, म्हणजे जोपर्यंत मास्क आहे तोपर्यंत थोडी सुटका मिळू शकेल. रस्त्यातून जाताना कचऱ्याची गाडी आल्यास त्याच्या घाण वासापासून सुटका मिळविण्यासाठी आपण रुमाल वापरतो, तसे हे झाले; परंतु वातावरणात असलेल्या उपरोल्लेखित विषारी वायुपासून संरक्षण होईल काय ? म्हणून मास्क घालणे किंवा रुमाल वापरणे हा प्रदूषणावरील कायमचा उपाय नव्हे. दिवसेंदिवस या प्रदूषणामुळे वातावरणातील प्राणवायुचे प्रमाणही कमी कमी होत आहे व जेव्हा हा राक्षस मानवजातीच्या गळ्याभोवती टाकलेला फास आवळायला लागेल त्यावेळेस तर ते अत्यल्प असेल आणि म्हणूनच मास्क घालूनही काही उपयोग नाही. मग, या महाभयंकर प्रदूषणरूपी राक्षसाशी सामना करण्यास काही अस्त्र आहे की नाही ? हाच प्रश्न उरतो. प्रदूषणामुळे उद्‌भवलेल्या या गंभीर परिस्थितीमुळे हताश किंवा निराश व्हायचे काहीही कारण नाही; कारण प्रदूषणावर चार वेगवेगळे उपाय सुचवले गेलेले आहेत. कारखाने कमी करणे, वाहने कमी करणे, वनीकरण आणि नित्य अग्निहोत्र हे चार प्रमुख उपाय आहेत.

आज सर्व जगात कारखान्यांची वाढ होत आहे. वाढत्या लोकसंख्येची गरज पाहता व उद्योगधंद्यांचे जागतिकीकरण पाहता आपण त्यात मागे राहू शकत नाही. कारखाने बंद केल्यास लाखो लोक बेकार होतील व अनेकांचे संसार रस्त्यावर येतील. त्याशिवाय हल्ली बेकार लोक जास्त आहेत. यामुळे कारखाने बंद करण्याचा उपाय व्यावहारिक वाटत नाही. आज आपली वाढती लोकसंख्या पाहता असलेली वाहने दळणवळणासाठी कमी पडत आहेत, हे आपण रोज पाहतो. मुंबईतील किंवा अन्य कुठल्याही शहरातील धावणाऱ्या लोकल ट्रेन्स किंवा बसेसमध्ये लटकून जाणारे प्रवासी हेच दर्शवतात की वाहनांची संख्या वाढली पाहिजे, जेणेकरून प्रवाशांचे हाल कमी होतील. म्हणून वाहने बंद करणे, हा उपायही व्यवहार्य नाही, याबद्दल दुमत असू नये.

तिसरा उपाय वनीकरण, अर्थात झाडे लावणे. परंतु झाडे नुसती लावून उपयोगी नाहीत, तर ती जगतात का व वाढतात का हे पाहणे अतिशय महत्त्वाचे आहे. प्रदूषणामुळे जमिनीचा कस व ताकद कमकुवत झाली आहे. त्यामुळे झाडे नीट वाढत नाहीत व जमिनीमध्ये मुळे खोलवर सोडून घट्ट उभीही राहू शकत नाहीत. प्रदूषित वातावरणामध्ये वाळवीसारख्या हानीकारक कीटकांची वाढ झपाट्याने होते व हे कीटक झाडांवर हल्ला करून त्यांना नेस्तनाबूत करून टाकतात. परिणामी अनेक मोठी झाडेदेखील पडत असल्याचे आज दिसून येते. त्यामुळे वनीकरण यशस्वी करायचे असेल, तर प्रथम शुद्ध, प्रदूषणविरहित वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. म्हणून वनीकरणाबरोबरच घरोघरी अग्निहोत्र सुरू केले पाहिजे, जेणेकरून वनश्री वाढेल.

शुद्ध वातावरणामुळे निसर्गाचा ढासळलेला तोल सांभाळला जाईल, प्रकृतीचे बिघडलेले चक्र व्यवस्थित चालू लागेल. पर्यायाने पर्जन्यवृष्टी वेळेवर होऊन मानव, प्राणी व वनस्पती यांना अतिशय पोषक वातावरण तयार होईल. या वातावरणातून निर्माण होणारे अन्नधान्य सकस असेल. वनांची वाढ होऊन अरण्ये निर्माण होतील व तीच पशूपक्षांची अभयारण्ये ठरतील. म्हणून जगातल्या कुणालाही कुठेही करता येण्यासारखा परिणामकारक, साधा, सरळ, सुटसुटीत, कमीत




कमी वेळ व खर्चात घरोघरी करता येण्यासारखा उपाय जो 'अग्निहोत्र' त्याबद्दल माहिती घेऊया.

हा वेदात सांगितलेला वातावरण शुद्धीचा शास्त्रीय उपाय आहे. अग्निहोत्र संध्याकाळी सूर्यास्ताच्या वेळी व सकाळी सूर्योदयाचे वेळी केले जाते. यासाठी विशिष्ट आकाराचे तांब्याचे पात्र, गाय किंवा बैलाच्या शेणापासून तयार केलेल्या गोवऱ्या, निवडलेले अखंड तांदूळ (अक्षता), गाईचे तूप, अग्नि प्रज्वलित करण्यासाठी खडा धूप, कापूर किंवा गाईच्या तूपात भिजवलेल्या फुलवाती हे साहित्य लागते.

सूर्यास्ताच्या वेळेपूर्वी अग्निकुंडात गोवऱ्या पेटवून अग्नि प्रज्वलित करावा. दोन चिमुट अखंड तांदळांना गाईचे तूप लावून दोन आहुति तयार ठेवून बरोबर सूर्यास्ताची वेळ होताच पुढे दिलेले दोन मंत्र म्हणून या आहुति अग्नित सोडाव्यात.

**सूर्यास्ताचे मंत्र :**

**अग्नये स्वाहा अग्नये इदं न मम** (पहिली आहुति द्या)
**प्रजापतये स्वाहा प्रजापतये इदं न मम** (दुसरी आहुति द्या)

असाच विधी सकाळी सूर्योदयाच्या वेळी करावा.

**सूर्योदयाचे मंत्र :**

**सूर्याय स्वाहा सूर्याय इदं न मम** (पहिली आहुति द्या)
**प्रजापतये स्वाहा प्रजापतये इदं न मम** (दुसरी आहुति द्या)

आहुति भस्म होईपर्यंत शांत बसावे. साधारण दोन मिनिटात आहुति भस्म होते. अग्नि प्रज्वलित करण्यासाठी रॉकेल, डिझेल, गॅस आदी खनिज इंधन वापरू नयेत. अग्नि चांगला प्रज्वलित व्हावा म्हणून गोवऱ्या अग्निकुंडात अशा रचाव्या की त्यात हवा खेळून निर्धूम अग्नि तयार व्हावा. अग्निहोत्र सुरू करताना संध्याकाळीच करायचे असते; कारण आम्हाला अंधारातून प्रकाशाकडे जायचे आहे.

## अग्निहोत्रातील विज्ञान :

### (१) अग्निचा गुणधर्म :

अग्निचा गुणधर्म असा आहे की ज्या गोष्टी आपण अग्नित अर्पण करतो त्या गोष्टींची तत्वे अग्नि आपल्याला वातावरणात देतो. उदा. अग्निमध्ये मिरची पडली असता मिरचीतील तिखट तत्वे वातावरणात येऊन वातावरण तिखट होते, तर चंदन पडले असता चंदनातील सुगंधी तत्वे वातावरणात येऊन

वातावरण सुगंधित होते. या गुणधर्माचा वापर करून आपण वातावरण औषधी व तुष्टी-पुष्टीदायक तत्वांनी भरू शकतो.

**(२) गोवंशाचे (गाईचे/बैलाचे) शेण (गोवऱ्या) व गाईचे तूप :**

वातावरणातील प्रदूषण घालवण्यासाठी वातावरणात तुष्टी-पुष्टीदायक पोषक, औषधी व शुद्ध गोष्टी सोडणे आवश्यक आहे. गोवंशाच्या शेणात व गाईच्या तूपात प्रदूषण निवारक असे अनेक विशेष गुणधर्म आहेत; म्हणून ते जेव्हा अग्नित अर्पण केले जातात तेव्हा अग्निच्या गुणधर्मानुसार त्यातील तत्वे वातावरणात येऊन प्रदूषण निवारण होते. अग्निहोत्रामध्ये गोवंशाच्या शेणास व गाईच्या तूपास पर्याय नाही.

**(३) अग्निपात्राच्या पिरामिड आकाराचा गुणधर्म :**

पिरामिड आकारात वातावरणातील सूक्ष्म शक्ती स्वत:कडे खेचून घेऊन पात्राच्या मध्यभागी केंद्रित करून ठेवण्याची शक्ती आहे. अशा सूक्ष्म शक्तींच्या अस्तित्वाने वातावरण शुद्ध राखण्यास मदत होते. इजिप्तमधील पिरामिडस्च्या आतील शवे चांगल्या परिस्थितीत आहेत ती यामुळेच.

**(४) सूर्यास्त-सूर्योदय वेळेचा परिणाम :**

शास्त्रज्ञांनी आज जाणलंय की सूर्यास्त व सूर्योदयाच्या बरोबरवेळी अनेक तऱ्हेच्या सूक्ष्म शक्ती, जसे इथर, इलेक्ट्रिसिटीज, इलेक्ट्रोमॅग्नेटिक वेव्हज इत्यादी सूर्याकडून पृथ्वीवर प्रचंड प्रमाणावर कोसळत असतात. याच सूक्ष्म शक्ती अग्निपात्र स्वत:कडे खेचून घेते. म्हणूनच अग्निहोत्र फक्त सूर्यास्त व सूर्योदय समयीच करता येते.

**(५) मंत्रांचा परिणाम :**

मंत्रांच्या उच्चारणाने आपल्या आसपास प्रचंड सुखदायक कंपने निर्माण होतात. ती आपल्या शरीरावर व मनावर उपयुक्त परिणाम करतात.

**(६) अग्निपात्रात वापरलेला धातू-तांबे :**

हा शीघ्रवाहक धातू असल्यामुळे सूक्ष्म शक्ती आकर्षित करताना मदत करतो. तांब्याच्या अणूचा आकारदेखील पिरामीडसारखा असल्यामुळे अग्निहोत्र पात्र हे छोट्या छोट्या अनेक पिरामिडस्नी बनल्यासारखे आहे व त्यामुळे त्याची ती शक्ती वाढते. अग्निहोत्र करताना हा धातू तापल्यामुळे त्यातून निगेटीव्ह आयॉन्स बाहेर पडतात व ते वातावरणातील तरंगणाऱ्या पदार्थांना खाली बसवतात.

## अग्निहोत्राचे फायदे :

**(अ) शारीरिक शुद्धिकरण :**

प. जर्मनीतील एक महिला मोनिका येले यांनी अग्निहोत्र विभूती व अग्निहोत्र वातावरण याचा वापर करून अनेक शारीरिक व्याधी बऱ्या केल्या आहेत. त्या प्रयोगांचा पेपर त्यांनी तेथून प्रसिद्ध केला आहे.

**(ब) हवेतील विषारी वायुंवर परिणाम :**

मुंबई येथील इस्कॉन या संस्थेने अग्निहोत्र वातावरणाची नमुना तपासणी केली असता या वातावरणात विषारी वायुंचे, तसेच तरंगणाऱ्या पदार्थांचे प्रमाण खूपच कमी असल्याचे त्यांना आढळले आहे.

**(क) हवेतील रोगाणूंवर परिणाम :**

पुणे व मुंबई येथे वैज्ञानिकांनी अग्निहोत्राचा हवेतील रोगाणूंवरचा परिणाम तपासला असता अग्निहोत्रानंतर रोगाणूंचे प्रमाण ९२ ते ९७ टक्के कमी झाल्याचे आढळले. म्हणजेच अग्निहोत्र केलेली जागा निर्जंतुक होते असे म्हटले तरी चालेल.

**(ड) सूक्ष्म शक्ती वलयाचे बळकटीकरण :**

जर्मनीतील डॉ. मथायस फ्रायंझर यांनी किरीलीयन फोटोग्राफी तंत्राद्वारे सिद्ध केले आहे की केवळ अग्निहोत्र केल्याने मानवाभोवतालचेच नव्हे, तर झाडांभोवतालचे सूक्ष्म शक्तीचे वलय बळकट होते. यावरून अग्निहोत्राचा वनीकरणाला खूपच फायदा होतो हेच सिद्ध होते.

एकंदरित अग्निहोत्रामध्ये तूप, गोवऱ्या, अग्नि, मंत्र इत्यादींच्या एकत्रिकरणाने प्रचंड विस्फोट होऊन सगळी पोषक तत्वे हवेत पसरतात आणि त्यामुळे प्रदूषणावर मात होते व घरातील वातावरण उत्तम राहते. एका अग्निहोत्राचा परिणाम १२ तास असतो आणि बारा तास हा परिणाम प्राण व मन यांवर होतो. दोघांचा अन्योन्य संबंध आहे. म्हणून अग्निहोत्र सूर्यास्त व सूर्योदय अशा दोन्ही वेळा करायचे आहे, जेणेकरून २४ तास शुद्ध वातावरण मिळू शकेल.

**अग्निहोत्र करण्यास जात, कुळ, वंश, वर्ण, धर्माचे कर्मठ नियम लागू नाहीत. म्हणूनच तुम्ही कुठल्याही खंड, देश, प्रदेशातील असाल, कुठल्याही व्यवसायात असाल, गरीब/श्रीमंत, स्त्री/पुरुष असाल आणि कुठल्याही परिस्थितीत असाल, तरी अग्निहोत्र आजच सुरू करा !**

❑❑❑

# अमृतकलश

(श्री साईलीलाच्या जुन्या अंकातील निवडक मजकूर)

## श्रद्धाच तुमचे रक्षण करील

'राष्ट्रवाणी' (मुंबई) या गुजराथी साप्ताहिकाचे संपादक श्री. रमणिक सरैय्या आपल्या पत्राच्या ता. ५/९/५९ च्या अंकात लिहितात की, 'श्रद्धेने साध्य होणार नाही असे या जगात काही नाही. श्रद्धेशिवाय सिद्धी नाही. श्रद्धेशिवाय खरी भक्ती नाही व श्रद्धेशिवाय जीवन व्यर्थ आहे. मी प्रत्यक्ष पाहिलेली एक घटना येथे नमूद करीत आहे. तो रविवारचा दिवस होता. 'राष्ट्रवाणी' कचेरीतील कामकाज संपवून मी काही जरूरीच्या कामासाठी अब्दुल रहिमान स्ट्रीटवरून जात होतो. इतक्यात त्या रस्त्यावरील एका दुकानातून शास्त्रोक्त मंत्रोच्चार चालू असल्याचे मी ऐकले. त्या दुकानासन्निध्य जाऊन क्षणभर उभा राहिलो. कोणी एक ब्राह्मण दुकानात बसून चंडीपाठाचे श्लोक स्पष्ट उच्चारात म्हणत होता. त्याच्यासमोर एक तरुण तो पाठ भक्तिभावपूर्वक तल्लिनतेने श्रवण करीत होता. भिंतीवर श्रीसाईबाबांची तसबीर लावलेली होती. अगरबत्तीच्या सुगंधाने ते दुकान दरवळून गेलेले होते. रविवारचा रजेचा दिवस. अब्दुल रहिमान स्ट्रीटसारखा व्यापारी विभाग आणि तेथे प्रभूची भक्ती अनन्यभावे चाललेली होती.

सुतार चाळीसमोरच्या अब्दुल रहिमान स्ट्रीटवर हरिश्चंद्र आणि कंपनी यांच्या दुकानी ही घटना चाललेली होती. आत डोकावून पाहू लागलो तो, तेजस्वी चेहऱ्याचा तो तरुण माझ्या चांगला दृष्टीस पडला. त्याच्या भव्य चेहरेपट्टीचा माझ्या मनावर परिणाम झाला. आमची दृष्टादृष्ट झाली. त्या सद्गृहस्थाने खुणा करून मला दुकानात बोलावले व जवळ बसायला सांगितले. मी मंत्रमुग्ध झालो होतो. मी जवळ जाऊन बसलो. काही वेळाने चंडीपाठ पूर्ण झाला तेव्हा त्या गृहस्थाने 'आपणास कोण पाहिजे ?' असा सवाल केला.

'मी आपल्याशी दोन शब्द बोलू इच्छितो, मला काही विचारायचे आहे. विचारू का ?'

'जरूर विचारा; संकोच बाळगू नका.'

'आपले नाव काय ?'

'हरिश्चंद्र वाडिलाल पारिख.'

'असे का ? आपणच का या दुकानाचे मालक ? आपण साईभक्त दिसता ?'

'होय; हे माझेच दुकान. मी साईभक्त आहे हे आपण कसे ओळखले ?'

'साईभक्त कधी दडून राहतो का ? आपली साईबाबांवर भक्ती कशी जडली सांगाल का ?'

'भाई ! त्याच्यामागे थोडा इतिहास आहे. तुम्ही प्रेमाभावाने विचारता तेव्हा मला तो इतिहास सांगावासा वाटतो. त्याचे असे झाले. एके दिवशी अहमदाबादहून माझे एक व्यापारी मित्र माझ्याकडे आले. त्यांचे व माझे अतिशय निकटवर्ती मित्रत्वाचे संबंध होते. ते मला म्हणाले, 'मी शिरडीला जात आहे आणि आपण माझ्याबरोबर आले पाहिजे. मी उद्याच जाणार आहे शिरडीला आणि माझ्याबरोबर तुमचेही तिकीट काढले आहे. तेव्हा आलेच पाहिजे !'

'पण-पण-' मी काचरत बोलत होतो.

'पणबिण काही नाही. तुम्हाला माझ्याबरोबर शिरडीला यावेच लागेल,' तो व्यापारी मित्र निर्धारपूर्वक म्हणाला.

'तुम्ही मला एवढा आग्रह करीत आहात तेव्हा माझी एक खाजगी गोष्ट किंवा अडचण म्हणा, मला सांगितलीच पाहिजे. सध्या मी एका संकटात सापडलो आहे. ह्या दोन-चार दिवसांत एका गृहस्थाला काही ठराविक रक्कम मला दिलीच पाहिजे. नाहीपेक्षा माझ्या अब्रूचे दिवाळे निघणार आहे. त्या चिंतेत मी सध्या आहे !'

'चिंता करण्याचे काही कारण नाही. ज्यांच्या दर्शनास मी घेऊन जात आहे त्या श्रीसाईबाबांवर संपूर्ण श्रद्धा ठेवा; सारा भरिभार त्यांच्यावर सोपवा. तेच तुम्हाला चिंतामुक्त करतील !' तो व्यापारी मित्र आश्वासनपूर्वक म्हणाला.

माझा निरुपाय झाला. कधी कधी मनातील चिंता दूर सारून मित्रांच्या शब्दाला मान द्यावा लागतो. मला वाटले, कदाचित्

यातूनच काहीतरी मार्ग निघेल.

आणि शेवटी त्या व्यापारी मित्राबरोबर मी शिरडीला गेलो. साईबाबांच्या समाधी मंदिरात जाऊन बाबांना भक्तिभावपूर्वक प्रार्थना केली. बाबाच मला संकटांतून मुक्त करतील. दुसरे कोण करणार ? या श्रद्धेने मी घरी आलो.

सकाळी नेहमीपेक्षा लवकर उठून स्नान आटोपून बाबांचे ध्यान करीत बसलो होतो. इतक्यात मेथाजी माझ्याजवळ घाईने येऊन म्हणाले, 'अमूक व्यापाऱ्याकडून त्यांच्याकडे येणे असलेल्या रकमेचा चेक आला आहे.'

ती बातमी ऐकून मी आश्चर्याने थक्क झालो. मला जरूर असलेल्या रकमेचा चेक आलेला होता व ठरलेल्या मुदतीत माझे निकडीचे देणे मी फेडू शकणार होतो. किती आनंद झाला मला त्या क्षणी ! माझ्या नेत्रावाटे २-३ अश्रू खाली पडले. मला साईबाबांचे स्मरण झाले. त्यांच्या अपार कृपेचा महिमा समजून आला. साईबाबांनी माझी लाज राखली. माझी अडचण दूर केली. केवढी ही त्यांची कृपा !

'साईबाबा तुमच्या श्रद्धायुक्त भक्तीला पावले. तुम्ही खरोखरच भाग्यवान आहात !' मी समाधानपूर्वक म्हटले.

'होय; खरे आहे तुमचे म्हणणे. त्यानंतर मी वारंवार शिरडीला जाऊ लागलो. माझा व्यापारधंदा वाढत जावा; माझ्या हातात अधिकाधिक पैसा खेळावा ही माझी मोठी आकांक्षा होती. बाबांच्या कृपेने ती पूर्ण झाली आहे.'

तो रविवार होता हे मी आरंभीच सांगितले आहे. हरिश्चंद्रभाईंची ती कथा ऐकून मला आनंद झाला. त्यांच्या रूपाने मला एका नव्या व साईभक्त मित्राची जोड झालेली होती. तेथील कामकाज संपले होते. ते मला म्हणाले, 'तुमची आडकाठी नसेल व तुम्हाला आता कुठे जायचे नसेल तर चला ना माझ्या घरी !'

त्यांच्या स्नेहाखातर मी त्यांच्या घरी जायला तयार झालो. घरी जाताच तेथील वातावरणाचा माझ्या मनावर अत्यंत इष्ट परिणाम झाला. हरिश्चंद्रभाईंची पत्नी - त्यांचे नाव सौ. उर्मिलाबाई - त्याही भक्तिभावपूर्वक चंडीपाठ करण्यात गुंतलेल्या होत्या. पतीपत्नी; दोघेही साईभक्त. अशी जोडी या जगात क्वचितच पहायला सापडते. उभयतांच्या भेटीने व त्यांच्या आगतस्वागताने मी भारल्यासारखा झालो. मला वाटले की, खरोखर हे खरे तेजस्वी व आदर्श जीवन. ती श्रद्धा आणि ती भक्ती सर्व कुटुंबांच्या वाट्याला येवो हीच माझी प्रार्थना.

ooo

# एका कुटुंबातील तीन दाखले

श्री. चंद्रवदन ठाकोर, अध्यक्ष, श्री साईबाबा सत्संग मंडळ, सुरत हे लिहितात की, श्री साईबाबा सत्संग मंडळाचे माळी श्री. नगीनदास जगूभाई यांची पत्नी सौ. पालीबेन हिच्या कपाळावर कोड उठले होते. दिवसेंदिवस त्यांचा विस्तार वाढत चालला होता. त्यामुळे त्या बाईला बाहेर पडणे अत्यंत लाजिरवाणे वाटू लागले. तिने नाना प्रकारचे उपाय केले; परंतु कोड काही केल्या जाईनात. एका गुरुवारी ती बाई आमच्या सत्संग मंडळात श्रीसाईबाबांच्या तसबिरीपुढे भजन चालू असता तेथे भक्तिभावाने आली. माझ्या व्याधीवर काहीतरी उपाय सांगा अशी तिने विनवणी केल्यावरून तिला एकवीस गुरुवार कर व बाबांचे नेहमी स्मरण करीत जा असे सुचविण्यात आले. तिने त्याप्रमाणे भक्तिभावपूर्वक आचरण केले. तिने तीन गुरुवार केल्यानंतर तिच्या कपाळावरील कोडाचे डाग मावळायला सुरुवात झाली.

त्याच कुटुंबातील सुमारे वीस वर्षाचा मंगूभाई या नावाचा एक मुलगा क्षय रोगाने आजारी होता. दिवसेंदिवस तो खंगत चालला होता. त्याची आशा वाटत नव्हती. डॉक्टरांनीही हात टेकले होते. श्रीबाबांच्या चरणकमलाजवळ त्याला बसविण्यात येऊन त्यांची करुणा भाकण्यात आली. त्याच्या मातापित्याने भक्तिभावाने मारलेली हाक बाबांनी ऐकली व त्यांच्या कृपाप्रसादाने तो बरा झाला. त्याची प्रकृती आता चांगली सुधारली असून डॉक्टर लोकांस त्याबद्दल आश्चर्य वाटत आहे.

त्याच कुटुंबातील आणखी तिसरा दाखला. लहान दीड एक वर्षाचे बालक एकाएकी आजारी झाले. काय करावे सुचेना. आई, वडील गांगरून गेले. बाबांवर त्यांची निस्सीम निष्ठा. शेवटी तीच कामी आली. त्या बालकास जीवदान द्यावे म्हणून प्रार्थना करण्यात आली. त्यांच्या दरबारी ती प्रार्थना रुजू होऊन बालक बचावले व फिरू लागले !

हे तिन्ही प्रकार प्रत्यक्ष घडलेले असून त्या कुटुंबाकडे मंडळाच्या नावे पत्रव्यवहार करून वाटेल त्याने आपली खात्री करून घ्यावी. बाबांची कृपा झाल्यावर मनुष्य दुःखमुक्त होतो; मात्र श्रद्धापूर्वक त्यांना शरण गेले पाहिजे.

राष्ट्रवाणी, ता. १८-७-५९

# बाबांचा कृपाप्रसाद

श्री. देवसी धरमसी गुजराथी, मु. श्रीरामपूर, जि. नगर हे कळवितात की, भागिरथीबाई ही माझी मेहुणी असून तिला


कोणीतरी आमच्या वाईटावर असलेल्याने चहातून विष दिले. तेव्हापासून ती वेड्यासारखी वागू लागली व चाळे करू लागली. माणसांकडे पाहून ती कधी हसायची, तर कधी रडायची. वेळेवर चहा, जेवण घेत नसे. तिचे सारे अवेळी व वाटेल त्यावेळी होत असे. काय करणार ? वैद्य, डॉक्टरांचे नाना प्रकारचे उपाय करून थकलो. तिच्या पायी आम्हाला फार त्रास होऊ लागला.

नंतर एके दिवशी तिला घेऊन आम्ही शिरडीस श्रीसाईबाबांच्या दर्शनासाठी गेलो. त्यापूर्वी शिरडीस माझे जाणे येणे होत असे. बाबांच्या दरबारी जाऊन मेहुणीस गुण आल्यास पहावे असे वाटू लागले. आम्ही दर्शनास गेलो तो दिवस गुरुवारचा होता. पूजा-अर्चा झाली. आम्ही सायंकाळच्या आरतीस हजर राहिलो. आरतीत सगळीजणं टाळ्या वाजवीत होतो. इतक्यात माझ्या मेहुणीचे सर्वांग थरथर कापू लागले व ती धाडकन् जमिनीवर कोसळली. सभोवार गर्दी जमा झाली. मी जवळ जाऊन अंगाला हात लावून पाहिला तर तिचे सर्वांग कापत होते. मुखातून शब्द बाहेर पडत होते. श्री बाबांनी तिच्या शरीरात संचार केला होता. तिच्या मुखावाटे बाबा बोलत होते.... बाई, काळजी करू नकोस. सात गुरुवार उपवास कर. नऊ गुरुवारी माझ्या वाऱ्या कर. म्हणजे तू या त्रासातून मुक्त होशील. जा, चिंता करू नकोस.

या दृष्टांताप्रमाणे तिने केले व तिला आस्ते आस्ते गुण येऊन आता ती पूर्ववत् बरी झाली आहे.

(संग्राहक : **सुभाष जगताप**)

## आदर्श उपक्रम




श्री साईभक्तीने प्रेरित अनेक साईभक्त मंडळे साईभक्ती प्रचाराचे कार्य करीत आहेत. डोंबिवलीचे 'ॐ साई सेवक मंडळ' हे त्यापैकीच एक प्रमुख मंडळ आहे. या मंडळातर्फे दरवर्षी साईभक्तांचा स्नेहमेळावा भरविला जातो. यंदाच्या वर्षी या स्नेहमेळाव्यानिमित्त या मंडळाने हेमाडपंतलिखित 'श्री साईसचरित' पोथीतील ५३ अध्यायांतील निवडक १०८ ओव्यांची एक छोटीशी पुस्तिका साईभक्तांना प्रसादभेट दिली आहे. साईअनुभव कथन, साईसचरित पारायण, साईभजनाचे गायन आदी अनेक प्रकारचे उपक्रम या मंडळाने आजवर केलेले आहेत. निवडक १०८ ओव्यांची छोटी पोथी प्रसिद्ध करून या मंडळाने एक आदर्श उपक्रम केलेला आहे.

## ।। दत्त संप्रदाय ।।

या पंथात विष्णू आणि शिवभक्तीचा मिलाफ दिसून येतो. दत्तात्रेय हा ब्रह्मा, विष्णू आणि महेश या त्रयींचा संगय होय ! पुराणे व उपनिषदे या दैवताच्या उत्पत्तीची, तसेच त्याच्या कार्याची, शिष्यांची व तत्त्वज्ञानाची माहिती पुरवितात. ह्या सर्व लेखी पुराव्यांवरून हे दैवत मुळात कारण शाक्तपंथीय असावे, असे वाटते. पाच 'म'कारांच्या उपभोगाचीही माहिती यात आढळते. बाराव्या शतकात दत्तात्रेयाची मूर्ती 'एकमुखी' आढळते. मात्र पंधराव्या शतकापासून ती 'त्रिमुखी' झालेली दिसते.

महाराष्ट्रात या दैवताचा उल्लेख महानुभाव, वारकरी व नाथ पंथांतही आढळतो. श्री नृसिंहसरस्वती (इ.स. १३००) यांचा जन्म अकोला येथे झाला. त्यांनी दत्तोपासनेला एक वेगळेच स्वरूप देऊन महाराष्ट्रात हा पंथ लोकप्रिय केला. ते स्वत: गावोगावी हिंडले व पंथाचा प्रचार केला. त्यांना सुदैवाने अत्यंत गुणी असा शिष्यगण प्राप्त झाला. उदाहरणादाखल नावे घ्यावयाची झाल्यास जनार्दन स्वामी, दासोपंत, मुक्तेश्वर, माणिक प्रभू व श्रीधरस्वामी यांना विसरता येणार नाही.

दत्तात्रेयाचे उपासक या दैवताची पूजा 'गुरु'च्या स्वरूपात करतात. म्हणूनच की काय 'गुरुदेव दत्त' किंवा 'श्रीगुरू दत्त' असा या दैवताचा उल्लेख होत असतो. हा पंथ, वर्णाश्रम धर्माचा पुरस्कार करीत असला तरी, संन्यास धर्माला विशेष मानतो. गुरुभक्ती, साधना, सिद्धान्त व पादुका-पूजा यांवर या संप्रदायाचा विशेष भर आहे. उपासक वर्ग हा बहुधा माहूर, औदुंबर, नरसोबाची वाडी व गाणगापूर (कर्नाटक) येथे यात्रा करीत असतो. शिरडीचे साईबाबा हे काहींच्या मते दत्तात्रेयाचे अवतार आहेत. या संप्रदायाकडे हिंदू संन्यासीच नव्हे, तर मुसलमान फकीरसुद्धा आकर्षित झाले होते.

सौजन्य : 'महाराष्ट्र' - मार्ग पब्लिकेशन्स्



# आत्मदर्शन

## (रमण महर्षि गाथा)

काव्यानुवाद : राधाकृष्ण गुप्ता 'चेतन'

**महर्षि रमण यांचा आध्यात्मिक अधिकार जगविख्यात आहे. एक साक्षात्कारी सत्पुरुष - एक योगी - एक तत्त्वचिंतक म्हणून त्यांची सर्वांना ओळख आहे. कवि 'चेतन' यांनी ११ गीतांमधून महर्षि रमण यांची जीवनगाथा मराठी वाचकांसाठी सादर केलेली आहे.**

नमन तुला रे हे गणराया।
बुद्धि दे मज चरित्र गाया ॥ध्रु॥

येथे असती काही प्रियजन
मितभाषी, शुद्ध अंतरमन
त्यांच्या ठायी असे देवपण
नमितो त्यांचा पाया ॥१॥

बुद्धिची तू असे देवता
स्फूर्ति द्यावी मजला आता
लिहावया हे चरित्र 'रमणा'
देवा अविघ्नालया ॥२॥

आई महालक्ष्मी ! तुज नमन
नित्य असू दे हे मन उन्मन
आलो मीही अता तव शरण
करी सहाय्यकार्या ॥३॥

नमो नमो हे सद्गुरूनाथा
चराचरी तू असे व्यापिता
तूच जीवन, तुझींच सत्ता
स्फूर्ति दे लिहावया ॥४॥

पूर्ण व्हावी ही रमण गाथा
तव चरणीं मी नमितो माथा
'शब्दकोष'च आहे ज्ञाता
करी कृपेची छाया ॥५॥

卐卐卐

'शिव' हे त्यांचे दैवत होते,
त्या शिवउत्सवात
आला जन्मासी हा बाळ ॥ध्रु॥

एकोणसाव्या तो शतकात
तिरूचुलली तीर्थक्षेत्रात
भक्त भाविक 'अलगम्मा'तात
'शिव'वर त्यांची अखंड प्रीति,
'शिव' हे असे त्रिकाळ ॥१॥

बालपणी तो अतिशय हुड
बुद्धिने चपळ परि उदंड
मित्रांचा तो नेता बलदंड
अद्भुत ऐसी वृत्ति त्याची,
पाहतसे दिग्पाल ॥२॥

वेंकटरमण झोपेत असता
मित्र तयाचे, त्या झोडपिता
जाग मुळी न येई तत्त्वता
घडतसे ते नवल अन् अद्भुत,
लीला त्याची रसाळ ॥३॥

卐卐卐

शब्द तो कानीं पडता – वीज चमकली चित्ता
देहभानहि विसरले – आनंदकल्लोळ उठता ॥ध्रु॥

वृत्ति सहज बदलली – क्रीडा गोडी पळाली
'अरूणाचल' चिंतनाने – आली अंतर्मुखता ॥१॥

'पेरिया पुराण' वाचले – चित्त बेहोष झाले
'असेच आपण व्हावे' – ध्यास लागला जीवा ॥२॥

एकदा नवल झाले – मरणाचे भय ठाकले
'पाहू रे मरण कैसे' – येतसे हो जीविता ॥३॥

शरीर केले ताठसे – श्वास रोधला धैर्याने
पाहिली वाट त्यांनी, मरणाची, बोधिता ॥४॥

तोचि स्फुरण झाले – 'देह नव्हे' हे कळाले
मरणभयहि पळाले – 'अमरत्व-मी' समझता ॥५॥

दृष्टि पहा पालटली – अबोध वृत्ति गेली
होई ती आत्माकार – लाभे सहज गंभीरता ॥६॥

卐卐卐

पाहताच् मूर्ति देवांची, मीनाक्षी मंदिरी
वाहती अश्रु नयनीं ॥ध्रु॥

देवा ! अता कृपा करावी
तुआं पायी मिठी घडावी
'संतांपरी हो मला करवी'
हीच् प्रार्थना चरणीं ॥१॥

म्हणें एकदा ज्येष्ठभ्राता
हृदय असे तल्लीन होता
जावे घर सोडून तत्त्वता
योगार्थ जनींवनीं ॥२॥

ज्येष्ठ भ्राता करी उपहास
रमणास वाटे सत्य खास
कशास आता हा गृहपाश ?
वैरागी नित्य मनीं ॥३॥

एके दिनीं ते घर सोडले
पत्र एक ते लिहून ठेविले
"शोध न माझा करा हे भले"
भेंट पित्याची मनीं ॥४॥

असे झाले हो अभिनिष्क्रमण
पुन्हा न येणें घरी परतून
नाही मागे पाहणें वळून
घराकडे जीवनीं ॥५॥

卐卐卐

भेंट झाली पुत्रपित्याची, हर्ष मनीं आगळा
काय वर्णु तो सोहळा ॥ध्रु॥

लक्ष्य लागले अरूणाचली
तिरुवण्णामलै क्षेत्रशाली
अरयण्णेल्लूर देवालयी
तेजोरूप शिवभेंट झाली
आनंद मनीं जाहला ॥१॥

सन् अठराशे शहाण्णवात
आला पित्याच्या सदनांत
स्वागत झाले अपूर्व तेथ
बंद दारे उघडली क्षणांत
दिन सोनियाचा आला ॥२॥

आलो देवा ! हाक ऐकून
सारा संग तेथे सोडून
आता तूच रे मला आधार
झाला त्याला साक्षात्कार
तिथेच अखंड विसावला ॥३॥

卐卐卐

पुत्र सहवासाने माता, ही 'विश्वमाता' झाली
धन्य धन्य माउली ॥ध्रु॥

टाकीचे ते घाव सोसले
परी देवपण अभंग राहिले
ब्रह्मानंदी चित्त गुंतले
देहासक्ति न उरली ॥१॥

त्रास झाला अति, खंत नाही
असे लीन तो ब्रह्मानंदी
'देहाहून वेगळा मीही'
ग्वाही सर्वांस दिली ॥२॥

माता येई भेटण्याला
आग्रह करी घरी येण्याला
परि निर्धार अभंग राहिला
वृत्ति ही पालटली ॥३॥

"प्रारब्ध-योगे सारे घडते
जाणून घे हे स्वस्थ चित्ते"
पुत्रशोके परतून येते
सेवा करीत राहिली ॥४॥

माता-पुत्र हा संबंध रूचला
साम्ययोग तो मला लाभला
आत्मकृपेचा क्षण लाभला
मुक्त झाली माउली ॥५॥

卐卐卐

शास्त्रग्रंथ वाचताना – केले ते आत्मसात
स्वानुभूतिने उमगले – रहस्य त्यांचे क्षणांत ॥ध्रु॥

"शास्त्रे परे च निष्णात" – हीच सद्गुरूची रीत
अधिकारपरत्वे उपदेश – सांगे रमण जनांत ॥१॥

अनेक साधक मुमुक्षुहि – भेटावयास येती
"मी कोण ?" पहा अंतरी – करीं विचार मनांत ॥२॥

जो जो विचार उठेल – त्या त्या मागे जा खोल
आत उडी घ्या सखोल – ''विचार मार्ग'' जगांत ॥३॥

तेथे विचार विरतील – ''मी'' ह्याच विचार उरेल
तोही अंती लुप्त होय – सत्यानुभूती मनांत ॥४॥

द्वैताभास तो नुरेल – आत्मनिष्ठाहि उरेल
बंधमुक्त ती करील – जीविलांना क्षणात ॥५॥

कशाची स्पृहा नाहीं – कुणाची भीति नाही
देहासक्ति तर नाहीं – महर्षींच्या हृदयांत ॥६॥

सर्वत्र पाहे अद्वैत – गुरु-शिष्य हे नसो द्वैत
कोण कोणासी वंदित ? – अशी दृष्टि जीवनांत ॥७॥

सर्वकाळ असे विदेही – स्वप्नवत् संसार राही
ईश-माया एक पाही – अभिन्न, अभेद, अनंत ॥८॥

卐卐卐

## महासमाधि

एक तारा निखळूनी, भूमिवर कोसळला
शिव समाधिस्थ झाला ॥ध्रु॥

कर्करोग हा देही जडला
विकारांनी तो जर्जर झाला
अनेक उपाय निष्फळ ठरले
विधिलेख हा वेगळा ॥१॥

''येणें-जाणें हा देहधर्म
स्थिरत्व हा आत्मधर्म''
'मी आत्मा' हे आठवा मर्म
विदेहीपणीं राहिला ॥२॥

देहासी असते अटळ मरण
परी शांत असे महर्षि रमण
स्थितप्रज्ञ उदासीन उन्मन
'अरुणाचल शिव' गेला ॥३॥

गर्जताती सारे भक्तराव
समाधिस्थ झाला ज्ञानराव
अर्पण करूं या चरणीं भाव
अमृत दिले विश्वाला ॥४॥

महानिर्वाण दिन
दिनांक : १५-४-१९५०

卐卐卐

जाईन मी रे कोठे ?
मी नित असतो येथे ॥ध्रु॥

अवती-भवती, फुलांत-मुलांत
रविबिंबांत, प्रकाश-नभांत
मी नित रमतो येथे ॥१॥

तुमच्या हृदयी मी खोल खोल
मुखातूनी अमृत बोल बोल
बोलत असतो येथे ॥२॥

कर्म-धर्मात, हास्य-लास्यांत
होऊन मीच रे साक्षीभूत
डोलत असतो येथे ॥३॥

मी तुमचा प्रिय, मजला तुम्हीं
शाश्वत सांगाती रे मीही
हृदयी असतो येथे ॥४॥

स्वप्नजगांत रे जाऊन आत
नित्य शोधा रे आत्मज्योत
चैतन्यरुप येथे ॥५॥

श्वासात होऊन मी-मी स्पंदन
प्रमाण माझे हे संजीवन
जीवन जगतो येथे ॥६॥

आश्रमांत या नित वावरतो
सर्वांना मी दर्शन देतो
येती भाविक येथे ॥७॥

卐卐卐

धन्य धन्य श्री रमणाऽश्रम
'शिवलोक' जणु ते भूतलावर ॥ध्रु॥

परमपवित्र ते पुण्यधाम
पराशांतिचे चिरविश्राम
अरुणाचल हा प्राचीन पर्वत
'शिव' हा तेथे मूर्तिमंत
अनुपम सुन्दर येथे परिसर ॥१॥

साधकांचे ते निज माहेर
मुमुक्षुचे तर नन्दनघर
आर्तांना तो परमाधार
सुखशांतिचे अखंड भांडार
अखंड राहे येथे गुरुवर ॥२॥

निसर्गाचे लाभले वैभव
सिद्धभूमीचे पावन लाघव
परम मंगलाचे शुभमंगल
जीवनीं असते येथे चंगळ
कृपामूर्त गुरूची त्यावर ॥३॥

ध्यानमंदिरी त्या कोचावरी
महर्षि बसती मौनधारी
दर्शनें चित्त प्रसन्न होती
'जीवनमरण' रहस्य उमगती
परमशांतिचे ते लौकिक घर ॥४॥

अरूणाचल दक्षिणामूर्ती
भगवान रमण पुण्यमूर्ती
'रमण-अरूणाचल' सार्थ नाम
भूलोकीचे पावन धाम
सहजहि जुळली हे दोन्हीं कर ॥५॥

卐卐卐

पूर्ण झाली आत्म्याची कथा
गाऊं या सद्गुरूचा महिमा ॥ध्रु॥

अवघी लीला ही आत्म्याची
जरी सरस्वती लिहीन साची
तरी हो अपुरी राहील ती
कोण लिहितो ? कोण वाचतो ?
अद्‌भुत आहे जन्मा - ॥१॥

थोर असे सद्गुरूचा महिमा
चंद्रम्याची शरद पौर्णिमा
जीवनास या लाभे सुषमा
मी तर आहे निमित्तमात्र
वेगळा असे कर्ता ॥२॥

संत अनेक तर सद्गुरू एक
नामे अनेक परि स्वरूप एक
गुरूकृपेची हीच तर मेख
आपणासारखे तात्काळ
करिती रे शरणगता ॥३॥

जिकडे पहावे तिकडे सद्गुरू
दृश्य-द्रष्टा हे अद्वैत धरूं
पार कराया हा भवसागरू
दीपस्तंभ ते अंधारात
मार्ग दाविति जना - ॥४॥

ग्रंथ हेही असे संतथोर
त्यांचे उपकार अनंत अपार
नाव तराया हा भवसागर
वाङ्‌मयी ही मूर्ति प्रभुची
उजळी जीवन भक्ता - ॥५॥

हे दयानिधे ! करूणाकरा !
कृपा करा हे भास्करा !
अखंड तुमची तेजोधारा
विश्व उजळूं दे तव किरणांनी
हरवून सारी विपदा - ॥६॥

सुरेश पाटील बिल्डिंग, 'बी' विंग,
बालाजी मंदिर रोड, डोंबिवली (पूर्व), ठाणे.

## साईभक्त लेखकांना आवाहन

श्री साईबाबा मंदिर परिसर पुनर्विकासाचे काम युद्ध पातळीवर चालू असून येत्या ४/५ महिन्यांत ते पूर्ण होईल, अशी अपेक्षा आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर साईभक्तांना दर्शनासाठी रांगेत ऊन-पावसात रस्त्यावर उभे रहावे लागणार नाही. शांतीनिवास-भक्तनिवासमध्ये रांगेत दर्शन मिळेल. पुनर्विकास बांधकामाचे आर्किटेक्ट यांच्या मतानुसार दर्शन रांगेतील शेवटच्या भक्तास ३ तासांत दर्शन मिळेल.

सदर ३ तासांत मनोरंजन, ज्ञान देण्याच्या दृष्टीने ऑडिओ-व्हिडिओ (दृक्-श्राव्य) द्वारे दोन ते अडीच तास श्री साईसच्चरितातील ५२ अध्याय चित्ररूपाने दाखविणे, तसेच श्री साईसच्चरितातील बोध व अनुभव आणि इतर माहिती दाखविणे, ऐकविणे याकरिता प्रथमत: १००० सी.डी. तयार करण्याचा व्यवस्थापन मंडळाचा मानस आहे.

तरी, ऑडिओ-व्हिडिओ-सीडी तयार करण्याकामी स्क्रिप्ट रायटर (संहिता-पटकथा लेखक) साईभक्तांना आवाहन करण्यात येत आहे की, याबाबतीत रुपरेषा, अपेक्षित कालावधी व मानधन इत्यादी संपूर्ण माहिती तपशिलासह बंद पाकिटात मा. कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान, शिरडी, जि. अहमदनगर या पत्त्यावर पाठवावी. सदर कॅसेटस् या मराठी-हिंदी-इंग्रजी-तेलुगु भाषेत करण्याचा मानस आहे.


**कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान, शिरडी

# साईउवाच

## साईचे बोल होती ना फोल

अध्याय ९ आणि १० – संग्राहक : प्र. का. सोमण
(निवृत्त लेफ्टनंट कर्नल)

*(मागील अंकावरून पुढे)*



### पार्श्वभूमी

ही नवव्या अध्यायातील कहाणी, मुंबईतील वांद्र्याच्या खापर्डे कुटुंबाबद्दलची आहे. बाबासाहेब खापर्ड्यांचा लहान मुलगा रामचंद्र हा साईनाथांचा एकनिष्ठ भक्त होता. त्याचे नित्याचे व्रत म्हणजे साईनाथांना नैवेद्य दिल्याशिवाय त्यानेच काय, पण घरातील कोणीही अन्नग्रहण करता कामा नये. एकदा त्याच्या आईला साईनाथांच्या दर्शनासाठी शिरडीस जाण्याची अनिवार्य इच्छा झाली व तिने आपला इरादा श्री बाबासाहेबांना सांगितला. त्यांनी लगेच होकार दिला, पण त्यांच्या पत्नीने एवढ्या दूर एकटे जाण्याऐवजी मुलगा रामचंद्र यास त्यांनी बरोबर न्यावे, असा त्यांनी आग्रह धरला.

पण हा बेत लहानग्या रामचंद्रास मुळीच पसंत पडला नाही. याचे कारण, त्यास शिरडीस साईदर्शनार्थ जाण्याची इच्छा नव्हती, असे मुळीच नव्हते. त्याची कथा निराळीच होती! त्याचे वडील बाबासाहेब हे 'प्रार्थना समाजिस्ट' होते व त्यांचा मूर्तिपूजेवर तसा फारसा विश्वास नव्हता. म्हणून रामचंद्राला भीती होती की त्याच्या नैवेद्याच्या व्रतामध्ये खंड पडेल. अखेर वडिलांनी जेव्हा त्याला आश्वासन दिले की पूजा-नैवेद्य वगैरे सारे ते नित्यनियमाने अगदी त्याच्याप्रमाणे करतील, तेव्हाच रामचंद्र आईबरोबर शिरडीस जाण्यास तयार झाला.

दोन-तीन दिवस बाबासाहेबांनी वचन पाळले, पण एक दिवस नैवेद्यांत खंड पडला. ही वांद्र्यास घडलेली गोष्ट शिरडीस साईनाथांपासून लपून राहणे शक्य होते का? सर्वांतर्यामी, त्रिकालज्ञानी बाबांना हे सारे लगेच ज्ञात झाले होते. म्हणून रामचंद्र व त्याची आई साईदर्शनाला मशिदीमध्यें गेली असताना, बाबांनी त्यांच्या घरी वांद्र्यास घडलेली गोष्ट कशी सांगितली ते पाहूया. बाबा म्हणाले :

**''काय करावें आई आज।**
**गेलों मी वांद्र्यास जैसा रोज।**
**नाहीं खावया प्यावया पेज।**
**उपाशी मज यावें लागलें ॥१०७॥**

**कैसा पाहा ऋणानुबंध।**
**कवाड होतें जरी बंद।**
**तरी मी प्रवेशलों स्वच्छंद।**
**कोण प्रतिबंध मज करी ॥१०८॥**

**मालक नाहीं मिळाला घरीं।**
**आंतडीं माझीं कळकळलीं भारी॥**
**तैसाचि मी अन्नावीण माघारी।**
**भर दुपारीं परतलों'' ॥१०९॥**

(रामचंद्राला वडिलांकडून काय चूक झाली ते लगेच कळले, म्हणून त्याने बाबांकडे वांद्र्यास लगेच परत जाण्याची परवानगी मागितली. बाबांनी जरा थांब म्हणून सांगितले तोंच त्याच्या वडिलांचे क्षमायाचना करणारे पत्र शिरडीस पोहोंचले. सर्वांचे नेत्र प्रेमाश्रूंनी भरले व साईनाथांना सर्व गोष्टींची खबर कायमची कशी असते याचे कौतुक वाटले.)

**पार्श्वभूमी**

या रामचंद्राची आई मनाने खूपच मृदू होती. दयेने तिचे अंत:करण कायमचे ओथंबलेले असे. असेच एकदा जेवणाची पानें वाढली असताना, तेथे (शिरडीत) एक कुत्रे आले. त्यामागोमाग चिखलाने बरबटलेले एक डुक्करही आले. आईने त्यांना भाकरीचा चतकोर खाण्यासाठी दिला. दुपारी नित्याप्रमाणे जेव्हा त्या बाई मशिदीत बाबांचे दर्शनास आल्या, त्यावेळी त्यांना उद्देशून बाबा म्हणाले :

**''आई त्वां आज मज जेवूं घातलें।**
**तेणें हें आकंठ पोट भरलें ॥**
**होते हे प्राण व्याकुळ झाले।**
**ते तृप्त केले गे तुवां ॥१२०॥**

**ऐसेंच करीत जावें नित्य।**
**हेंच कामीं येईल सत्य।**
**मशिदींत बैसून मी असत्य।**
**बोलेन हें त्रिसत्य घडेना ॥१२१॥**

**ऐशीच माझी दया जाणावी।**
**भुकेल्या भाकर आधीं द्यावी ॥**
**आपुल्या पोटा नंतर खावी।**
**धरावें जीवीं हें नीट'' ॥१२२॥**

(बाबा हे जे काही बोलले त्याचा अर्थ त्या बाईंना मुळीच कळला नाही. त्या विचार करू लागल्या. मग लगेच बाबा म्हणाले :)

**''सेवूनियां ती प्रेमाची भाकर।**
**जाहलों मी तृप्त निर्भर।**
**अजून मजला येती ढेकर''।**
**बाबा प्रत्युत्तर करितात ॥१२५॥**

**''तूं जेवूं बैसतां द्वारीं येतां।**
**पोटीं क्षुधेची जया व्याकुलता।**
**त्वां देखिलें ज्या श्वाना अवचिता।**
**मज एकात्मता तयासवें ॥१२६॥**

**तैसें सर्वांगीं माखिला चिखलासी।**
**देखिलें त्वां जया सूकरासी।**
**भुकेनें व्याकुळ झालेलियासी।**
**माझी तयासीं एकात्मता'' ॥१२७॥**

**ऐकोनि बाबांची वचनोक्ति।**
**बाई पावली विस्मय चित्तीं।**
**श्वाने सूकरें मांजरें वावरती।**
**बाबाचि काय तीं समस्त ॥१२८॥**

**''कधीं मी श्वान कधीं सूकर।**
**कधीं मी गाई कधीं मांजर।**
**कधीं मुंगी माशी जलचर।**
**ऐशिया विचरत रूपें मीं ॥१२९॥**

**पाही भूतमात्रीं जो मज।**
**तोचि माझिया प्रीतीचा समज।**
**तरी तूं भेदबुद्धीतें त्यज।**
**ऐसीच भज मजलागीं'' ॥१३०॥**

(सर्व भूतांतर्यामी जो परमात्मा तो प्रत्यक्ष साईरूपांत ज्यांनी स्वत: पाहिला व अनुभवला त्यांच्या भाग्याची काय कल्पना करावी !)

**पार्श्वभूमी**

साईनाथ सर्वज्ञ आहेत व त्यांच्यापासून कोणतीच गोष्ट कोणीही, कधीही लपवून ठेवू शकत नाहीं, हें आजवरच्या अनेक कथांवरून आपण पाहिले. तशीच ही एक कथा सौ. खापर्डेबाईंची आहे. वांद्र्याचे गोविंदरावजी हे एक साईभक्त शिरडीस जाण्यास निघाले. तेव्हा ते सौ. खापर्डेबाईंना भेटले. घरांत बाबांना द्यायला दुसरे काहीं खास नव्हते म्हणून त्यांनी एक उरलेला चांगला पेढा त्यांच्याबरोबर बाबांसाठी दिला व म्हणाल्या, बाबा तो पेढा आवडीने खातील. गोविंदरावजी शिरडीस पोहोंचले. पण दोन वेळा बाबांचे दर्शनास जाऊनही गोविंदरावजी पेढा बिऱ्हाडीच विसरले. तिसऱ्या वेळच्या दर्शनाच्या वेळी मात्र बाबांनी स्वत: त्यास विचारले :

**''त्वां मजसाठीं काय आणिलें''**

(त्यांनी ''काही नाही'' म्हणताच बाबांनी त्यांना स्मरण दिले -)

**''तुला कोणीं कांहीं वस्तु ।**
**दिधली नाहीं का मजप्रीत्यर्थ'' ।**

(पुन्हा त्यांनी ''नाही'' म्हणताच साईनाथांनी विचारले :)

**''अरे घराहून निघतेवेळीं ।**
**नाहीं का दिधला तुझियाजवळी ।**
**खाऊ आईनें प्रेमसमेळीं'' ॥**

(मग त्यांना पेढ्याची आठवण झाली आणि त्यांना बिऱ्हाडी धावत जाऊन पेढा आणून बाबांना दिला.)

**हातीं पडतांच मुखीं समर्पिला ।**
**भाव संतर्पिला आईचा ॥१५६॥**

श्री अण्णासाहेब दाभोलकर पुढे लिहितात :

**ऐसा हा साई महानुभाव ।**
**जया मनीं जैसा भाव ॥**
**तया तैसा देऊनि अनुभव ।**
**भक्त गौरव वाढवी ॥१५७॥**

**आणिक या कथांचें इंगीत ।**
**भूतीं सदैव पहावा भगवंत ।**
**हेंचि सकलशास्त्रसंमत ।**
**हाचि सिद्धांत येथील ॥१५८॥**

**अध्याय ९ वा समाप्त**

## अध्याय १० वा

पार्श्वभूमी

या अध्यायात साईनाथांनी त्यांच्या भक्तांपुढे जी अपूर्व लीनता दाखविली आ हे तिचे वर्णन करण्यास कोणाचेही शब्द कमी पडतील; म्हणून प्रथम श्री अण्णासाहेब दाभोलकरांनी बाबांबद्दल काय म्हटले आहे ते पाहून नंतर 'साई उवाच'कडे वळू. अण्णासाहेब म्हणतात :

**यशवंत आणि श्रीमंत ।**
**वैराग्यशाली ज्ञानवंत ।**
**ऐश्वर्य औदार्यमंडित ।**
**षड्गुणान्वित मूर्ति हे ॥८५॥**

**काय तयांचा कृपाभाव ।**
**घेती भक्तांचा जडवूनि भाव ।**
**नाहींतरी तयांचा ठाव ।**
**कोण देव गिंवसिता ॥८७॥**

साईनाथ त्यांच्या भक्तांना उद्देशून म्हणाले :

**''दासानुदास मी तुमचा ऋणी ।**
**निघालों दर्शनीं तुमचिया ॥९०॥**

**ही एक तुमचीच कृपा मोठी ।**
**झाली मज तुमचे पायांची भेटी ।**

(श्री अण्णासाहेब दाभोलकर पुढे म्हणतात :

**काय बाबांची ही लीनता ।**
**नम्रपणाची ही हौस चित्ता ।**
**काय ही उच्च निरभिमानता ।**
**शालीनता ही तैशीच ॥९२॥**

**वरील हे बाबांचे उद्‌गार ।**
**खरे म्हणूनि केले कीं सादर ।**

**जन्मोजन्मींच्या आमुच्या तपा ।**
**फक्त ती केवळ साईकृपा ।**
**तृषार्तासी जैसी प्रपा ।**
**तैसी अपार सुखदाती ॥९५॥**

**जयासी नाहीं विषयस्फूर्ति ।**
**कैसे तरी ते विषय सेविती ।**
**विषय जयांच्या इंद्रियां न शिवती ।**
**ते काय गुंतती विषयांत ॥९७॥**

**अध्याय १० वा समाप्त**

# ।। श्री दत्तजन्म ।।



श्रीगणेशाय नमः ।। श्रीसरस्वत्यै नमः ।। श्रीगुरुभ्यो नमः ।। श्रीदत्तात्रेयाय नमः ।। जयजयावो गजवदना ।। मंगलारंभीं तुझीच प्रार्थना ।। वंदितांहो तुझिया चरणा ।। ग्रंथ पावो सिद्धीसी ।।१।। जयजयावो सरस्वती ।। आदिमाया तूंचि शक्ती ।। बैसोनि माझे जिव्हेवरूती ।। ग्रंथसिद्धी नेईजे ।।२।। जयजयावो गुरुनाथा ।। कृपाकर ठेवूनि माझिया माथां ।। सिद्धीस न्यावें या ग्रंथा ।। हाचि वर मज देंई ।।३।। तुमचें होतां कृपाबळ ।। ग्रंथसिद्धीसि जाय सकळ ।। हें वेदवाक्यजाश्वनीळ ।। पुराणांतरीं बोलतसे ।।४।। ॐ नमो जी श्रीदत्ता ।। पूर्णब्रह्मसनातना ।। निष्कलंकानि-गुणातीताअपरिमिता ।। मूळमायाविरहिता ।। जगतारका जगद्गुरु ।।५।। पूर्णब्रह्मसनातना ।। निष्कलंकानिरंजना ।। हे शून्यातीत निर्गुणा ।। गुणानिर्गुणातीत तूं ।।६।। जयजयावो अत्रिनंदना ।। जयजयावो

परात्परगहना ।। जयजयावो मधुसूदना ।। कृपागहना जगद्गुरू ।।७।। जयजयावो दिगंबरा ।। जयजयावो करुणाकरा ।। जयजयावो दयासागरा ।। करुणार्णवा दीनबंधू ।।८।। जयजयावो भक्तपालका ।। जयजयावो जगव्यापका ।। जयजयावो जगन्नायका ।। कृपा करीं दीनावरी ।।९।। जयजयावो अवधूता ।। जयजयावो विश्वकर्ता ।। जयजयावो कृपावंता ।। अव्यक्तव्यक्ता सुखमूर्ती ।।१०।। ऐसा महाराज गुरुदत्त ।। त्याचें माहात्म्य ऐसें वर्णित ।। चित्त देवोनिसावचित्त ।। ऐका सकळ श्रोते हो ।।११।। पूर्वी नारदें तप अपार केलें ।। तयासि श्रीविष्णु प्रसन्न जाहले ।। वर द्यावयासी आले ।। मग तेणें केला प्रणिपात ।।१२।। करोनि साष्टांग नमस्कार ।। उभा राहिला जोडोनि कर ।। जयजयावो विष्णुकरुणाकरा ।। अपेक्षित वर देईजे ।।१३।। अवघे रजोगुण तमोगुण ।। हे द्वयविरहित करून ।। मुख्य सत्वरूपजाण ।। तें दाखवीं मजलागीं ।।१४।। ऐसें बोलतां नारदमुनी ।। सांगता जाहला कैवल्यदानी ।। ऐक सखया चित्त देउनी ।। सत्वरूपाचा विचार ।।१५।। त्रिभुवनींचे सत्वरूप जें ।। ते मीच आहें बा जाणिजे ।। परी तम मजसी पाहिजे ।। म्हणोनि सत्व कमी ही ।।१६।। ऐसें बोलतां मोक्षदानी ।। नारदमुनि जोडोनिपाणी ।। विचारिता जाहला तयेक्षणीं ।। तमकासयासांगपां ।।१७।। मग श्रीविष्णु बोलत ।। जरी मी सत्वरूपीं राहत ।। तरी माझे निहस्तें दैत्य ।। मरणार नाहीं सहसाही ।।१८।। हें जाणोनियां मानसीं ।। किंचित् सत्व विधिहरांसी ।। देऊनियां तमोगुणासी ।। रजोगुणासी जवळ केलें ।।१९।। ऐसा विचार आहे नारदा ।। जरी तुज पाहिजे सत्वगुणसंपदा ।। तरी एक आहे ब्रह्मवृंदा ।। सांगतों सकळ परियेसीं ।।२०।। जरी ब्रह्मा विष्णु त्रिनेत्र ।। तिघे होतील एकत्र ।। तरीच सत्वरूप स्वतंत्र ।। दृष्टी पडेल जाणपा ।।२१।। ऐसें ऐकूनि उत्तर ।। बोलता जाहला मुनिवर ।। त्रिपुरांत कविधिचक्रधर ।। करितों एकत्र जाणपां ।।२२।। ऐसे बोलोनि तेवेळीं ।। नारद आले भूमंडळीं ।। तटस्थ जाहली सुरमंडळी ।। हा संवाद ऐकोनियां ।।२३।। भूमंडळीं नारदमुनी ।। विचार करी अंतःकरणीं ।। ब्रह्मा विष्णु शूळपाणी ।। एकत्र कैसे होती ते ।।२४।। ऐसा विचार करित करित ।। त्रिभुवनीं नित्य हिंडत ।। तंव एके दिवशीं अवचित ।। अत्रिसदना पातला ।।२५।। ऋषि नव्हता आश्रमांत ।। उभा राहिला ब्रह्मसुत ।। अनुसूयेनें देखोनि त्वरित ।। आसन दीधलें बैसावया ।।२६।। आसनीं बैसवूनि नारदमुनी ।। आपण कांडणा बैसे अंगणीं ।। इतुकियांत अत्रिमुनी ।।

अकस्मात पातला ।।२७।। स्त्रियेप्रती बोले उत्तर ।। उदक देंई वो सत्वर ।। ऐसें ऐकतां चित्ते सुंदर ।। उठती झाली ते काळीं ।।२८।। मुसळ गेलें होतें वरुतें ।। तें तैसेंच सोडिलें तेथें ।। आणोनि दीधली पती तें ।। उदक झारी तेधवां ।।२९।। ऐसें देखोनि ब्रह्मसुत ।। मनांत तेव्हां आश्चर्य करित ।। धन्य धन्य माउली सत्य ।। अनुसूयासती हो ।।३०।। मनीं विचारी नारदमुनी ।। अनुसूया पतिव्रतेमाजी शिरोमणी ।। ईचे दर्शनें करूनी ।। दोष जातील निर्धारें ।।३१।। मग तेथोनि नारद निघाला ।। मनांत विचार एक योजिला ।। आतां जाऊन वैकुंठाला ।। लक्ष्मीपार्शी सांगावें ।।३२।। तेणें होईल कार्यसिद्धी ।। हें जाणोनियां आत्मशुद्धी ।। तेथूनि निघाला त्रिशुद्धी ।। पवनवेगें करूनियां ।।३३।। वैकुंठासि जाऊनि सत्वर ।। लक्ष्मीपार्शी समाचार ।। सांगता झाला मुनीश्वर ।। अनुसूयेचा तेधवां ।।३४।। नारद सांगे लक्ष्मीलागोनी ।। अनुसूयासती अत्रिपत्नी ।। त्रिभुवनांत पाहतां शोधोनी ।। तिची सर न येचिपां ।।३५।। पतिव्रतांमाजी शिरोमणी ।। स्वरूपें जैसी लावण्यखाणी ।। तिचें चातुर्य पाहतां नयनीं ।। परमानंद वाटतसे ।।३६।। हा सकळ वृत्तांत ऐकतां ।। लक्ष्मी जाहली विस्मित चित्ता ।। ह्मणे मृत्युलोकीं पतिव्रता ।। ऐशी सत्वरक्षक आहे कीं ।।३७।। तरी आतां श्रीविष्णूसी पाठवूनी ।। तिचें सत्व घेईन हिरोनी ।। ऐसें ऐकतां नारदमुनी ।। परम संतोष पावला ।।३८।। मग तेथूनि नारद निघाला ।। मनोवेगें कैलासासी गेला ।। पार्वतीसी वृत्तांत सांगीतला ।। लक्ष्मीसारिखा तेधवां ।।३९।। वृत्तांत ऐकूनि पार्वती ।। विस्मित जाहली परम चित्तीं ।। ह्मणे नारदा सांगसी कीर्ती ।। काय आश्चर्य मानवाचें ।।४०।। नारद म्हणे वो मृडाणी ।। अनुसूयेचे तुळणे लागुनी ।। तूंही न पुरसी गजस्यजननी ।। ऐसें मज वाटतसे ।।४१।। उमा ऐकूनि ते अवसरीं ।। परम क्रोधावली अंतरी ।। आदिमाया वो निर्धारीं ।। काय बोले ब्रह्मसुतासी ।।४२।। आतां धाडून कैलासपती ।। सत्व हरण करीन निश्चितीं ।। ऐसें बोलतां पार्वती ।। नारदासी आनंद ।।४३।। मग नारद निघाला तेथुनी ।। गेला सत्यलोकालागुनी ।। सर्व वृत्तांत पूर्ववत सांगोनी ।। सावित्री तेव्हां क्षोभिवली ।।४४।। सावित्री क्षोभविली हें देखतां ।। आनंद वाटे ब्रह्मसुता ।। म्हणे आपुलें कार्य आतां ।। लवकरची होईल ।।४५।। ऐसें विचारूनि चित्तीं ।। नारद निघाला पवनगती ।। तंव ते समर्थी त्रैमूर्ती ।। आपुलाले स्थाना पातले ।।४६।। तंव स्त्रिया वृत्तांत सांगती ।। मृत्युलोकीं मानवी वस्ती ।। त्यांत एक अनुसूयासती ।। आहे पहा